**किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ६३/२०२ निशाणी क्र.१ खालील आदेश**
**राजेभाउ वि शासन**
**[CNR NO.MHBI0900-0371-2026]**

१.		अर्जदार राजेभाउ बब्रुवान सोळंके याने प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३ अन्वये प्रस्तुत गुन्हयामध्ये जप्त करण्यात आलेला मुद्‌देमाल म्हणजे अर्जदाराचा Tata Motors चे LPT3118 SS टॅकर ज्याचा नोंदणी क्रं.MH-43-U-7610, असुन चेसीस क्र. MAT466372A5G06575 व इंजिन क्र. 01F62897288 हे वाहन परत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जाच्या पुष्टयार्थ अर्जदाराने त्याचे शपथपत्र देखील दाखल केले आहे.

२.		अर्जदाराचे कथन आहे की, त्याचे वर नमुद वाहन हे माजलगाव ग्रामीण पोलीसांनी अपराध क्र– ३३/२०२६ मध्ये जप्त केलेले आहे. सदर वाहनाचा अर्जदार हा मालक आहे. अर्जदाराने सदर वाहन त्यास परत मिळावे म्हणुन विनंती केलेली आहे.

३.		सहाय्यक सरकारी अभियोक्ता व तपास अधिकरी यांनी यांनी अर्जास हरकत घेतली आहे.

४.		दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदार यांनी नि.क्र.४ सोबत अर्जदाराचे आधारकार्ड प्रत, एफ.आय.आर. तसेच नि.७ सोबत वाहन आर.सी.बुक प्रत, वाहन विमाची पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे.

५.		सदर कामी अर्जदाराने दाखल केलेल्या वाहनाच्या वाहन वाहन नोदणी प्रमाणपत्र (आर सी बुक ) प्रतीचे व विमा प्रतीचे अवलोकन केले असता वाहन मालक म्हणुन अर्जदारच्या नावाची नोंद असल्याचे दिसुन येत आहे. सदर प्रकरणाचा निकाल लागण्यास काही कालावधी जाणार आहे. सदर प्रकरणामध्ये असे दिसून येते की, गुन्हा घडल्याच्या अनुषंगाने जप्त करण्यात आलेला मुद्‌देमाल हा अर्जदार यांचा आहे. मुद्‌देमालाचा ताबा अधिकार हा सकृतदर्शनी सदर अर्जदार यांचा आहे असे दिसुन येते. सदर प्रकरणातील मुद्‌देमालाचा विचार करता सदर मुद्‌देमाल हे एक प्रकारचे वाहन आहे. त्याच्यावर हवामानाचा परिणाम होणार आहे. सदर वाहन पोलीस स्टेशनमध्ये

पडुन राहील्यास त्याचा काहीही उपयोग होणार नाही. प्रथम खबरी अहवालाचे अवलोकन केले असता, सदर वाहन अपघातामध्ये जप्त केले असल्याचे व सदर अपघ ाातामध्ये फिर्यादीचा मुलगा बळीराम मस्के मयत झाल्याचे दिसून येते. परंतु, वाहन विमा प्रतिचे अवलोकन केले असता अपघाताच्या दिवशी वाहनाचा विमा असल्याचे दिसून येते. सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत सदर जप्त मुदद्देमाल अर्जदार याच्या ताब्यात देणे योग्य होईल. वरील कारणांचा विचार करून खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल म्हणजेच अर्जदाराची Tata Motors चे LPT3118 SS टॅकर ज्याचा नोंदणी कं.MH-43-U-7610, असुन चेसीस क्र. MAT466372A5G06575 व इंजिन क्र.01F62897288 हा सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यत अर्जदार यांना खालील अटी व शर्तीवर परत करण्यात येतो—

३. अ) अर्जदार याने न्यायालयाने आदेश दिल्यास जप्त मुद्देमाल न्यायालयात हजर करणे बाबत रक्कम रु.**६,००,०००/— (अक्षरी सहा लाख रू. मात्र) चे बंधपत्र दयावे.**

ब) अर्जदार याने जप्त मुद्देमालात कोणत्याही प्रकारे बदल करू नये अथवा विल्हेवाट लावु नये, तसेच कोणासही कोणत्याही प्रकारे तबदील करु नये.

क) अर्जदार याने सदर वाहन तपासी अधिकारी व न्यायालयाने मागणी केली असता सादर करावे.

ड) तपासी अंमलदार यांनी जप्त मुद्देमालाचे छायाचित्रे काढुन अर्जदारासमोर पंचनामा करून सदर कागदपत्रे दोषरोप पत्रासोबत न्यायालयात दाखल करावीत.

Digitally signed by GANESH SURESHAPPA KHUPSE
Date: 2026.03.12 17:44:49 +0530

माजलगाव
दिनांक : १२/०३/२०२६.

**( जी.एस.खुपसे )**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,(कोर्ट क्र.२)
माजलगाव.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".
Dictated, transcribed, checked & signed on : 12-03-2026

Sd/-

Date: 12-03-2026

R.M.Shaikh
Gr-III Stenographer
2nd Jt. Civil Court J.D.Majalgaon